वाचले :- १) शासन कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन निर्णय क्रं. रोहयो ११०२/प्र.क्रं.२/फ-२ दिनांक २९/०५/२००२

२) इकडील आदेश क्रं. पसह/कावि/११६९/२००५ दिनांक १०/१०/२००५

३) इकडील आदेश क्रं. पसह/कावि/१८९८/२०१० दिनांक १/१०/२०१०

४) इकडील सुधारीत आदेश क्रं. पसह/कावि/८०२/२०१२ दिनांक २/०७/२०१२.

५) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३२४ दिनांक- १७/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
सर्वसाधारण शाखा,
क्रं.सशा/पसह/कावि/१६१३ /२०१५
पुणे १ दिनांक - १८/०९/२०१५

**विषय :- रोहयो निगडीत फळबाग योजनेच्या सनियंत्रण व पुर्नविलोकन समिती**

**आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयान्वये व आदेशान्वये रोहयो निगडीत फळबाग योजनेच्या सनियंत्रण व पुर्नविलोकन समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. पालकमंत्री महोदयांकडून त्यांचेकडील दिनांक १७/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये प्राप्त शिफारशींचे अनुषंगाने अशासकिय सदस्यांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| अ.क्र | समितीची रचना व नांवे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १) | मा. पालकमंत्री<br>श्री. गिरीश भालचंद्र बापट | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२ | अध्यक्ष |
| २) | **जिल्ह्यातील लोकसभा सदस्य** | | |
| | अ) मा.श्री.बारणे श्रीरंग चंदू<br>खासदार, ३३ मावळ लोकसभा मतदार संघ | श्रीनिवास पद्मजी पेपर मिल जवळ थेरगाव, पुणे ४११ ०३३. | सदस्य |
| | ब) मा.श्री. अनिल शिरोळे,<br>खासदार, ३४ पुणेशहर लोकसभा मतदार संघ | गुलाब-शशीकला बंगला घोले रोड शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. | सदस्य |
| | क) मा.श्रीमती सुप्रियाताई सुळे,<br>खासदार, ३५ बारामती लोकसभा मतदार संघ | इ-१५ निसर्ग, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७. | सदस्य |
| | ड) मा. श्री. शिवाजीराव आढळराव पाटील,<br>खासदार ३६ शिरुर लोकसभा मतदार संघ | १०० बी, कल्पना अपार्टमेंट प्रभात रोड, लेन क्रं.९ एरंडवणा, पुणे- ४११ ००४. | |
| ३) | **जिल्ह्यातील राज्यसभा सदस्य** | | |
| | १)श्री. शरद पवार, राज्यसभा सदस्य | आमराई, बारामती, ता. बारामती, जि. पुणे | सदस्य |
| | २) श्रीमती अनु आगा, राज्यसभा सदस्य | थरमॅक्स हाऊस, वाकडेवाडी, पुणे- मुंबई रोड, पुणे ४११ ००५ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३) श्रीमती वंदना चव्हाण, राज्यसभा सदस्य | यशोधन, २१२१५१, रामबाग कॉलनी, पुणे-३० | सदस्य |
| | ४) श्री. संजय काकडे, राज्यसभा सदस्य | लिलावती निवास, प्लॉट नं ९यशवंत घाटगेनगर, युनिर्व्हसिटी रोड, भोसलेनगर, पुणे ४११ ००७. | सदस्य |
| | ५) श्री. अमर साबळे, राज्यसभा सदस्य | कोहिनूर योजना अपार्टमेंट, A-२०५, पिंपरी, पुणे | सदस्य |
| ४) | **जिल्हयातील विधानसभा सदस्य** | | |
| | १) श्री.शरद सोनावणे, विधानसभा सदस्य, १९५, जुन्नर, विधानसभा मतदार संघ | ता.जुन्नर, जि.पुणे | सदस्य |
| | २) श्री.दिलीप वळसे पाटील, विधानसभा सदस्य १९६, आंबेगांव, विधानसभा मतदार संघ | रिव्हरव्हयु बिल्डींग, नंबर २, प्लॉट नंबर १३/१४, येरवडा नगर रोड, पुणे | सदस्य |
| | ३) श्री.सुरेश गोरे, विधानसभा सदस्य १९७, खेड-आळंदी, विधानसभा मतदार संघ | मु.पो.राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | सदस्य |
| | ४) श्री.बाबुराव काशिनाथ पाचार्णे, विधानसभा सदस्य १९८, शिरुर, विधानसभा मतदार संघ | मु.पो.ताडोबाची वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | सदस्य |
| | ५) श्री.राहूल कुल, विधानसभा सदस्य १९९, दौंड, विधानसभा मतदार संघ | मु.पो.खुटबाव, ता.दौंड, जि.पुणे | सदस्य |
| | ६) श्री.दत्तात्रय भरणे, विधानसभा सदस्य २००, इंदापूर विधानसभा मतदार संघ | मु.पो.बावडा,ता.इंदापूर, जि.पुणे | सदस्य |
| | ७) श्री. अजित पवार, विधानसभा सदस्य, २०१, बारामती विधानसभा मतदार संघ | बारामती हॉस्टेल, गोखलेनगर, पुणे | सदस्य |
| | ८) श्री.विजय शिवतरे, विधानसभा सदस्य २०२, पुरंदर, विधानसभा मतदार संघ | मु.यादववाडी, पो.हरगुडे, ता.पुरंदर जि.पुणे | सदस्य |
| | ९) श्री.संग्राम थोपटे, विधानसभा सदस्य २०३, वेल्हा-भोर-मुळशी,विधानसभा मतदार संघ | शिवप्रेरणा,पंढरपूर-महाड रोड, ता.भोर, जि.पुणे | सदस्य |
| | १०) श्री.संजय भेगडे, विधानसभा सदस्य २०४, मावळ, विधानसभा मतदार संघ | रामकृष्ण निवास, २७९/५, शनिवार पेठ, भेगडे आळी, ता.मावळ, जि.पुणे | सदस्य |
| | ११) श्री.लक्ष्मण जगताप, विधानसभा सदस्य, २०५, चिंचवड विधानसभा मतदार संघ | शिवाजी चौक, जगताप पाटील कॉम्प्लेक्स, पिंपळेगुरव, ता.हवेली, जि.पुणे | सदस्य |
| | १२) श्री.गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य २०६,पिंपरी, विधानसभा मतदारसंघ | नालंदा कॉम्प्युटर सेंटर, १ ला मजला, डीलक्स सिनेमा चौक, पिंपरी, पुणे | सदस्य |
| | १३) श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य २०७, विधानसभा मतदार संघ | भोसरी, ता. हवेली, जि. पुणे | सदस्य |
| | १४) श्री.जगदीश मुळीक, विधानसभा सदस्य २०८,वडगांव शेरी, विधानसभा मतदार संघ | सेक्टर नं.१३ ब, त्रिंबकेश्वर सोसायटी, वडगाव शेरी, ता.हवेली, पुणे १४ | सदस्य |
| | १५) श्री. विजय काळे, विधानसभा सदस्य २०९, शिवाजीनगर, विधानसभा मतदार संघ | प्लॉट नं.४,९४०/४ शिवाजीनगर मॉडेल कॉलनी, कॅनॉल रोड, पुणे ४११ ००५. | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | १६) श्री.मेधा कुलकर्णी, विधानसभा सदस्य २१०, कोथरुड, विधानसभा मतदार संघ | ५ नंदनवन डहाणूकर कॉलनी, नं ८, कोथरुड, पुणे ४११ ०३८. | सदस्य |
| | १७) श्री.भिमराव तापकीर, विधानसभा सदस्य २११, खडकवासला, विधानसभा मतदार संघ | स.नं.३७/१, फाईव्ह स्टार सोसायटी, धनकवडी, पुणे ४३ | सदस्य |
| | १८) श्रीमती माधुरी मिसाळ, विधानसभा सदस्य २१२, पर्वती, विधानसभा मतदार संघ | स.नं.५७४, रामयणनगरी, डी-६, इमारत, बिबवेवाडी, पुणे | सदस्य |
| | १९) श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य २१३, हडपसर, विधानसभा मतदार संघ | छत्रपती शिवाजी चौक, कोंढवा गावठाण, पुणे - ४११ ०४८. | सदस्य |
| | २०) श्री.दिलीप कांबळे, विधानसभा सदस्य २१४, पुणे कॅन्टोनमेंट, विधानसभा मतदार संघ | परमार नगर हौ. सोसायटी, एच-२५१ फातीमा नगर वानवडी, पुणे ४११ ०१३. | सदस्य |
| **५) जिल्ह्यातील विधानपरीषद सदस्य** | | | |
| | १)श्री.जयदेव गायकवाड, विधानपरिषद सदस्य | कुमार पिनॅकल सोसायटी, फ्लॅट नं. ४०३, ताडीवाला रोड, पुणे | सदस्य |
| | २) श्री.अनिल भोसले, विधानपरिषद सदस्य | शिवाई बंगला, भोसलेनगर, पुणे १६ | सदस्य |
| | ३) श्रीमती दिप्ती चवधरी, विधानपरिषद सदस्य | १०२ वसंत वैभव, मॉडेल कॉलनी, लकाकी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६ | सदस्य |
| | ४) श्री.शरद रणपिसे, विधानपरिषद सदस्य | सी/२,वृंदावन पार्क रोड, बोट क्लब एरिया, पुणे | सदस्य |
| | ५) श्री. अनंत गाडगीळ,विधानपरिषद सदस्य | ४१९, शनिवार पेठ, काकासाहेब गाडगीळ पथ, पुणे ४११ ०३०. | सदस्य |
| ६) | जिल्हाधिकारी, पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१. | सदस्य |
| ७) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे | जिल्हा परिषद, कॅम्प, पुणे ४११ ००१. | सदस्य |
| ८) | उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना शाखा | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१. | सदस्य |
| ९) | प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बॅंक, बॅंक ऑफ महाराष्ट्र, पुणे | लोकमंगल,शिवाजीनगर, पुणें ४११ ००५. | सदस्य |
| १०) | **प्रगतशील फळ बागायतदार यांचे पाच प्रतिनिधी** | | |
| | १. श्री. नवनाथ शामराव चकोर | मु. पो. मांडवगण फराटा, ता. शिरुर, जि. पुणे मो. नं.९४०४९८९६३७ | सदस्य |
| | २. श्री. दत्तात्रय नामदेव ताम्हाणे | मु. पो. भरतगाव, ता. दौंड, जि. पुणे मो.नं. ९७६४९९४२०० | सदस्य |
| | ३. श्री. ज्ञानेश्वर हरिभाऊ चवरे | मु. पो. कडबनवाडी, पो. शेळगाव, ता.इंदापुर, जि. पुणे मो.नं.९९६०३१९१९९ | सदस्य |
| | ४. श्री. संभाजी विठ्ठल तांबे | मु. पो. ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१२ ४०९ | सदस्य |
| | ५. श्री. रविंद्र सोपान कोलते | भितांडे कॉम्पलेक्स, फ्लॅट नं.९, सोनाननगर रोड, चिंतामणी हॉस्पिटल शेजारी, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे मो. नं.९८५०५४६६६४ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे | जिल्हा कृषि कार्यालय, शिवाजीनगर, साखर संकुल जवळ, पुणे ४११ ००५ | सदस्य सचिव |

**सही/-*****
**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :- १) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे तथा, सदस्य सचिव, जिल्हा कृषि कार्यालय, शिवाजीनगर, साखर संकुलजवळ, पुणे ४११ ००५.

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठित करण्यात आलेली असल्याने सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रती संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे करिता

दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवडीद्वारे फळ विकासाची योजना-सन २००२-२००३ मध्ये पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्र. रोहयो ११०२/प्र.क्र.२/फ-२**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २१ मे, २००२.**

वाचा:- १)शासन निर्णय कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र. रोहयो/११००/प्र.क्र २२६/फ-२, दि. १३ जून, २००१.
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक रोहयो-१००१/प्र.क्र.८६/फ-२, दिनांक १२ ऑक्टोबर, २००१
३) संचालक फलोत्पादन कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रमांक कृषि आयु/फलो-१/रोहयो /शा.नि./२.०३/१९६/२००२, दिनांक १५ जानेवारी, २००२

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्रातील कृषि, हवामान ,शेती विषयी / पर्यावरण संबंधीचे प्रश्न, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व उच्च मुल्यांकित पिक रचना या सर्व गोष्टींचा विचार केल्यास फळवृक्ष लागवडीस महाराष्ट्रात भरपूर वाव आहे. हे लक्षात घेऊन शेतक-यांची आर्थिक प्रगती घडविणे व पडीक जमिनींचा विकास या हेतूने रोजगार हमी योजनेशी निगडित फळझाड लागवड कार्यक्रम राज्यात सन १९९० पासून राबविण्यात येतो. सन १९९० पूर्वी राज्यात फळझाड लागवडीखालील क्षेत्र २.४२ लाख हेक्टर क्षेत्र होते. केवळ या कार्यक्रमाच्या माध्यमातून सन २००१-२००२ अखेरपर्यंत राज्यातील एकूण १० लाख हेक्टर क्षेत्र आतापर्यंत फळझाड लागवडीखाली आले आहे. या कार्यक्रमास मिळत असलेला प्रतिसाद व त्यासाठी उपलब्ध असलेले वातावरण विचारात घेऊन दहाव्या पंचवार्षिक योजनेत रोजगार हमी योजनेशी निगडित फळझाड लागवड कार्यक्रम पुढे सुरु ठेवण्यात आला आहे.

**शासन निर्णय:-**

दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवडीद्वारे फळ विकासाची योजना-सन २००२-२००३मध्ये पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**२.उद्दिष्ट:-**

सन २००२-२००३ या वर्षी हा कार्यक्रम ४०,००० हेक्टर क्षेत्रावर राबविण्याचे उद्दिष्ट आहे.यामध्ये १५,००० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट कोकण विभागासाठी राहील व उर्वरित २५,००० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट इतर विभागासाठी राहिल. यामध्ये औषधी व सुगंधी वनस्पती लागवडीसाठी ६६० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट राहील. तसेच राज्यातील **चारही कृषि विद्यापीठाच्या परिसरात** प्रत्येकी १०० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट राहील.मात्र संबंधित कृषि विद्यापिठांनी त्यांना मागील वर्षी दिलेले लक्षांक पूर्ण केले नसतील तर मागील बाकी लक्षात घेऊन प्रत्येक कृषि विद्यापीठाला १००हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट राहील. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली कलमे/रोप शासकीय रोपवाटिका कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिका शेती महामंडळ, कृषि विज्ञान केंद्र व राज्यातील खाजगी रोपवाटिकेकडून उपलब्ध करुन घ्यावयाची आहेत. सन २००२-२००३ मध्ये फळपिकनिहाय उपलब्ध होणाऱ्या कलमा रोपांचे नियोजन त्यांचे वितरण या बाबत सविस्तर सूचना फलोत्पादन संचालक, कृषि आयुक्तालय यांनी सर्व संबंधितांना निर्गमित कराव्या.

**३.जिल्हा निहाय लागवडीचे उद्दिष्ट :-**

सन २००२-२००३ या वर्षासाठी उद्दिष्टाची जिल्हानिहाय व फळ पिकनिहाय विभागणी **परिशिष्ट क्रमांक १** व २ मध्ये देण्यात आलेली आहे. या उद्दिष्टांची फळपिकनिहाय विभागणी मध्ये बदल करावयाचे झाल्यास जिल्हास्तरीय समितीमार्फत तसे बदल करण्यात यावे. तसेच जिल्ह्याला दिलेल्या फळपिकांच्या उद्दिष्टांव्यतिरिक्त तांत्रिक सल्ल्यानुसार काही इतर फळपिके घ्यावयाची असल्यास जिल्ह स्तरीय समिती

बाबत निर्णय घेण्यास सक्षम राहिल. तसेच एकूण लक्षांकाच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार फळपिकनिहाय व जिल्हानिहाय लक्षांकात बदल करण्यास फलोत्पादन संचालक,पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**४.कार्यक्रमांअंतर्गत लावावयाची फळझाडे :-**

या योजनेअंतर्गत खालील फळझाडांची लागवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अ)कोरडवाहू पिके:-** १)आंबा,२)काजू ,३) बोर, ४) सिताफळ, ५) आवळा, ६) चिंच,७) फणस, ८)कोकम, ९) जांभूळ, १०) कवठ, ११) चारोळी

**ब)बागायती पिके:-**१२)नारळ,१३)संत्री,१४)मोसंबी,१५)चिकू,१६)डाळिंब,१७)पेरु,१८)अंजीर,१९)कागदी लिंबू,२०)सुपारी(सलग पिक).

**क) आंतर पिके:-** नारळ बागेत आंतर पिक म्हणून मसाला पिके, (मिरी, लवंग, जायफळ,दालचिनी) सुपारी.

**ड)औषधी व सुगंधी वनस्पती :-** १) आइरन, २) अर्जुना, ३) असन, ४) अशोका,५) बेल, ६) गुग्गुळ, ७)लोध्रा, ८)रक्तचंदन, ९) शिवण, १०) टेटू ११)बेहडा, १२) बिब्बा, १३)डिकेमाली, १४) हरडा, १५) रिठा, १६) वावडिंग, १७) करंज .

**५. क्षेत्र मर्यादा :-**

कोकण विभागासाठी प्रती लाभार्थी क्षेत्र मर्यादा कमीत कमी ०.१० हेक्टर व जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा १० हेक्टर पर्यंत व कोकण विभाग वगळता उर्वरित भागात कमीत कमी ०.२० हेक्टर व जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र मर्यादा राहील.

**६. लाभार्थी निवड व अर्हता:-**

गावात ज्यांच्या नावावर जमीन आहे असे सर्व शेतकरी, विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यता प्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या वगळून)ही जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास जमीन मालक व कुळ या दोघांची रु.२०/-च्या स्टॅम्पवर सक्षम अधिकाऱ्यांच्या समक्ष शपथपत्र आवश्यक राहणार नाही. कुळाचे नाव ७/१२ च्या उताऱ्यावर असल्यास कुळाच्या संमतीने लागवड करण्यात येईल.

**७. योजना राबविण्याकरिता मार्गदर्शक सूचना :-**

सन २००२-२००३ मध्ये रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना सोबतच्या **परिशिष्ट-३(अ)व३(ब)** मध्ये दिलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये या योजनेअंतर्गत लाभार्थी निवड अर्हता व पध्दत, लाभार्थीचे प्रशिक्षण, लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या, अनुदानाचा दर व वितरण, लागवड करण्याकरिता कलमे/रोपे यांचे नियोजन व पुरवठा, मातीचे परिक्षण इत्यादिचा तपशिल अंतर्भूत आहे. **परिशिष्ट-४(अ)(ब)(क)(ड)(इ)(फ)** मध्ये अनुक्रमे लाभार्थीचे विनंतीपत्र, करारपत्र, तांत्रिक मान्यता, खर्चाचा गोषवारा, पतमर्यादेची मागणी, लाभार्थ्यांची निवड,इ.बाबतची प्रपत्रे आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये कोणतेही बदल आवश्यक असतील तर सदर बदलास शासनाची प्रथम मान्यता घेऊनच सुधारित मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी. सदर योजनेअंतर्गत लागवडीसाठी दिलेले उद्दिष्ट साध्य करण्याकरीता आवश्यक पूर्वतयारी, प्रसिध्दि, लाभार्थी निवड, प्रशिक्षण, इत्यादि बाबतच्या पूर्वसूचना आयुक्त कृषि/ फलोत्पादन संचालक, पुणे यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**८. अनुदान वाटपाची पध्दत-**

या योजनेंतर्गत समाविष्ट झालेल्या सर्व लाभार्थ्यांना त्यांनी केलेल्या कामानुसार देय अनुदानाचे वाटप करण्याची पध्दत **परिशिष्ट-५** मध्ये दर्शविण्यात आली आहे. रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रमांअंतर्गत जिवंत झाडांची विहित टक्केवारी नसल्यास शासन निर्णय क्र.रोहयो १९९२/२६४३/ प्र.क्र.१३७/फ-२, दि.१७.४.९३ अन्वये लाभार्थीकडून वसुलीची कार्यवाही केली जाते. वसुलीची कार्यवाही जरी महसूल विभागामार्फत केली जात असली तरी त्याचा पाठपुरावा तालुका कृषि अधिकारी यांनी करावा. ही योजना यशस्वीरित्या राबविल्यानंतर शेतकऱ्यांना देय अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा केल्याचा तपशिल कळविणेसाठी विहित केलेले प्रपत्र **परिशिष्ट-६** मध्ये दिलेले आहे.

कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या अंतरानुसारच फळपिक निहाय लागवड केली असेल तरच लागवड केलेल्या क्षेत्राकरिता देय प्रमाणकानुसार अनुदान देण्यात यावे.

**९. प्रगती अहवाल:-**

हा कार्यक्रम **परिशिष्ट १ व २** मधील लागवडीच्या उद्दिष्टांनुसार राबविणेत येईल. या योजनेअंतर्गत लागवड कामाचा प्रगती अहवाल ग्राम स्तरावरील कर्मचारी आणि विविध स्तरावरील अधिकारी यांनी अहवाल पाठवावयाची पध्दत **परिशिष्ट-७** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**१०.तपासणी- नियंत्रण:-**

या योजनेअंतर्गत कर्मचारी/अधिकारी यांनी करावयाचे कामाची तपासणी व नियंत्रण याचे प्रमाण व पध्दत अनुक्रमे **परिशिष्ट-८ व ९** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**११.आढावा:-**

फळझाड लागवडीच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी तसेच सुनियंत्रण करण्यासाठी जिल्हा विभाग व राज्यस्तरावरील समित्यांची माहिती **परिशिष्ट-१०** मध्ये दिलेली आहे.

**१२. राज्यस्तरीय समिती:-**

योजनेअंतर्गत लाभार्थींना पुरवठा करण्यात येणारी कलमे/रोपे यांचे प्रापण करणे, त्यांचा दर निश्चित करणे, कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली कलमे/रोपे उपलब्ध करुन घेण्याकरिता निर्णय घेणे व त्याचा पुरवठा करणे यासाठी शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. रोहयो १०९४/प्र.क्र.६१७/फा-२, दि. १३ मे,१९९४ अन्वये स्थापन केलेली समिती २००२-२००३ या वर्षातही कार्यरत राहिल. या योजनेअंतर्गत उपलब्ध करावयाच्या कलमा/रोपांचा दर समितीमार्फत निश्चित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.सदर समितीची माहिती **परिशिष्ट-११**मध्ये दिलेली आहे.

**१३.भात खाचराच्या बांधावर लागवड :-**

कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व नागपूर विभागातील भंडारा, गोंदिया चंद्रपूर, गडचिरोली पुणे विभागातील अहमदनगर, पुणे, कोल्हापूर विभागातील कोल्हापूर, सातारा व नाशिक जिल्हयात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील भात पिकविणाऱ्या जिल्हयांतील भात खाचराच्या बांधावर आंबा (ठेंगू), नारळ, काजू, पेरु,आवळा व सिताफळ या फळपिकांच्या झाडांची लागवड करण्यात येईल. भात खाचराच्या बांधावर फळझाड लागवड प्रती लाभार्थी जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्राची मर्यादा राहील. भात खाचराच्या बांधावर फळझाड लागवडीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-३(ब) मध्ये देण्यात आल्या आहेत.भात खाचराच्या बांधावर फळझाड लागवड शासन आदेश दि. २५ जुलै, १९९७ मधील अटी व शर्ती व मार्गदर्शक तत्वाप्रमाणे राहील. आंबा फळपिकांचे खर्च प्रमाणकात बदल करुन झाडांची संख्या १०० प्रती हेक्टर राहील.

**१४.कातळ जमिनीत आंबा लागवड :-**

कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्हयांत जांभा कातळ जमिनीत आंबा लागवडीची योजना राबविण्यात मन्यता देण्यात येत आहे. जांभा दगडात खड्डा खोदण्यासाठी रुपये १७०.१४ प्रती खड्डा अनुदान देय राहील.

**१५. नारळ बागेत आंतरपिके :-**

कोकण विभागातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे या चारही जिल्हयात नारळ बागेत आंतरपिक म्हणून मसाला पिके तसेच सुपारी पिकाची लागवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मौजे तापोळा तालुका जावळी येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नारळ बागेत मसाला पिकाची आंतरपिक म्हणून मान्यता आहे. तसेच मिरी-लवंग, मिरी-जायफळ, मिरी-दालचिनी या मसाला पिकांची लागवड करण्यात येईल.नारळ बागेत मसाला पिकांची लागवड प्रती लाभार्थी जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्राची मर्यादा राहील.

१६. या वर्षी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापिठ, लोणेरे, जिल्हा रायगड** व **वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मंजिरी, पुणे** यांना त्यांचे अनुक्रमे १० हेक्टर व ३६ हेक्टर प्रक्षेत्रावर लागवड करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. ( या संस्थेचे लक्षांक हे संबंधित जिल्हयांच्या लक्षांकात समाविष्ट रहातील.)

१७. अकोला व वाशिम जिल्हयात बिब्बा (काळा), चारोळी व काजू या फळपिकांचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे

(११)

१८. **फळझाड लागवडीसाठी मुदत :-**
वरील फळझाड लागवड योजना योग्यरितीने राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रमाचे वेळापत्रक संचालक फलोत्पादन यांच्यामार्फत सर्व संबंधितांना यापूर्वीच वितरीत करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी. कोकण विभागासाठी ३० सप्टेंबर, २००२ व उर्वरित महाराष्ट्रासाठी नोव्हेंबर ,२००२ अखेरपर्यंत लागवड करण्यात येईल.

१९. **काजू विकास कार्यक्रम :-**
केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार १९९४-९५ पासून केंद्र पुरस्कृत काजू विकास कार्यक्रमाची सांगड रोजगार हमी योजनेंशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रमांतर्गत काजू विकास योजनेशी घालून या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत होती . सन २०००-२००१ या वर्षापासून केंद्र पुरस्कृत काजू विकास कार्यक्रमात क्षेत्र विस्तार या बाबीसाठी अनुदान उपलब्ध होणार नसल्याने रोजगार हमी योजनेशी निगडित लागवड केलेल्या काजू पिकाखालील क्षेत्रास अनुदान रोजगार हमी योजनेच्या तरतुदीतून राहील.

२०. रोजगार हमी योजनेशी निगडित फळविकास कार्यक्रमांतर्गत **डाळिंब पिकाची लागवड ४.५x ३ मिटर** अंतरावर करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. मात्र अशा लागवडीस अनुदान ५x५ मीटर अंतरावरील लागवडीप्रमाणेच राहील.

२१. कोकण विभागामध्ये दरवर्षी या योजनेतंर्गत आंब्याच्या हापूस जातीची सलग लागवड मोठ्या प्रमाणात होते . कोकण कृषि विद्यापिठाने केलेल्या शिफारशीनुसार आंब्याच्या हापूस जातीची लागवड करताना २० टक्के आंब्याच्या इतर जातीची लागवड करणे आवश्यक राहील. ( उदा. केशर, रत्ना, पायरी, सिंधु , गोवा, मानखूर, राजापुरी इ.)

२३. नियोजन विभागाने त्यांच्या शासन निर्णय क्र. मजुरी/२००१/प्र.१९/रोहयो-१० दि. १० एप्रिल, २००१ अन्वये ठरविण्यात आलेले मजूरीचे दर आणि परिशिष्ट १२ मध्ये नमूद केलेल्या राज्यस्तरीय समितीने सन २००२-२००३ करिता ठरविलेले कलमा रोपांचे दर यांच्या आधारे रोजगार हमी योजनेशी निगडित फळविकास कार्यक्रमातील खर्चाची सुधारित प्रमाणके **परिशिष्ट-१२(१)ते१२(२५) व१३(१)ते १३(१४)** प्रमाणे सोबत जोडले आहे.

२४. हे आदेश नियोजन विभाग (रोहयो) नियोजन विभाग (का १४४३) व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२/ रोहयो , दिनांक २६ एप्रिल,२००२ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४९ /व्यय-१ , दिनांक १ मे,२००२ असे आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वाक्षरी)
( फ. ब.खान )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव/ मा. मंत्री (जलसंधारण )यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव/ मा. राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व कुलगुरु ,कृषि विद्यापीठे
आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे

13

## परिशिष्ट - १०

### कार्यक्रमांच्या संनियत्रणासाठी निरनिराळया स्तरावरील समित्या

महाराष्ट्रात या योजनेंतर्गत फळबाग लागवडीच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी तसेच सनियंत्रण करणेसाठी ग्रामपातळी, जिल्हापातळी व राज्यस्तरावरील समित्या पुढीलप्रमाणे स्थापन करण्यांत येत आहेत.

१. **ग्रामस्तरीय समिती.**

| | | |
|---|---|---|
| १ | सरपंच | अध्यक्ष |
| २ | कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक | सदस्य सचिव |
| ३ | ग्रामस्तरीय पतपुरवठा संस्थेचे सचिव | सदस्य |
| ४ | तलाठी | सदस्य |
| ५ | गावातील दोन प्रगतीशील फळबागायतदार शेतकरी | सदस्य |
| ६ | ग्रामसेवक | सदस्य |

सदर समिती सभा महिन्यातून दोनदा घेण्यात यावी.

२.**जिल्हास्तरीय समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २ | उप जिल्हा अधिकारी ( रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य |
| ३ | जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक | सदस्य सचिव |
| ६ | जिल्हयातील सर्व उपविभागीय कृषि अधिकारी | सदस्य |

सदर समिती सभा महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

३.**विभागस्तरीय समिती .**

| | | |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | विभागीय कृषि सह संचालक | सदस्य सचिव |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( सर्व ) | सदस्य |
| ४ | फलोत्पादन विभाग प्रमुख, कृषि विद्यापिठे(त्याविभागातील) | सदस्य |
| ५ | विशेष कार्यकारी अधिकारी ( रोहयो) | सदस्य |

सदर समिती सभा तीन महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

४) **आयुक्तालयस्तरावरील समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त ( कृषि ), महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | संचालक फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ३ | संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण)महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ४ | संचालक, मृदसंधारण व पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५ | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ६ | फलोत्पादन विभाग प्रमुख , कृषि विद्यापीठे (सर्व) | सदस्य |
| ७ | सहसंचालक (फलोत्पादन) | सदस्य सचिव |

सदर समितीची त्रैमासिक सभा घेण्यांत यावी.

15

५) राज्यस्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव ( कृषि व फलो.) | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (नियोजन) | सदस्य |
| ३ | सचिव (रोहयो) | सदस्य |
| ४ | सचिव (ग्रामविकास व जलसंधारण विभाग) | सदस्य |
| ५ | सह/उपसचिव (फलोत्पादन) मंत्रालय | सदस्य सचिव |
| ६ | आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ७ | संचालक फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |

सदर समितीची सभा वार्षिक घेण्यांत यावी.

या शिवाय जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली योजनेचे संनियंत्रण व पुनर्विलोकनासाठी तसेच शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हयाला रोजगार हमी योजनेअंतर्गत खाली राबवावयाच्या फळबाग लागवड कार्यक्रमानुसार आढावा घेणे व योजनेच्या चांगल्या व अधिक प्रभावशाली अंमलबजावणीचे दृष्टीने शासनाला सुधारणा सूचविण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होईल.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| २ | जिल्हयातील लोकसभा / राज्य सभा सदस्य | सदस्य |
| ३ | जिल्हयातील विधानसभा / राज्य सभा सदस्य | सदस्य |
| ४ | जिल्हापरिषदेचे अध्यक्ष | सदस्य |
| ५ | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद | सदस्य |
| ७ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |
| ८ | उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) | सदस्य |
| ९ | जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी | सदस्य (निमंत्रीत) |
| १० | मा. पालक मंत्री यांनी सुचविलेले जिल्हयातील पांच प्रगतीशील फळबागायतदार शेतकरी. | |